# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या–५०**

**नागपूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापनेमध्ये स्थानिक उमेदवारांची भरती करण्याबाबत**

(१) **२१००** (२९-१-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) नागपूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापनेमध्ये ८० टक्के स्थानिक उमेदवारीची नोकर भरती करणे गरजेचे असून ती झाली नसल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याची शासन शहानिशा करणार आहे काय;

(३) औद्योगिक आस्थापनाने स्थानिकांना रोजगार न दिल्यास त्यावर नियंत्रण व पर्यवेक्षण तथा कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे दिलेली आहे;

(४) परप्रांतीयांना राज्यात नोकरी देतांना महसूल विभागाकडून अधिवास प्रमाणपत्र आवश्यक असतांना स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना नोकरीत समाविष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, स्थानिक बेरोजगार उमेदवारावर झालेल्या अन्यायाबाबत शासनाची भूमिका व धोरण काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई** : (३०-८-२०१५) (१) हे खरे नाही, नागपूर जिल्ह्यातील विविध आस्थापनांमध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ नुसार राखण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) औद्योगिक आस्थापनांमध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ नुसार राखण्याचे निर्देश आहेत. सदर धोरणाची अंमलबजावणी उद्योग विभागामार्फत केली जाते.

(४) हे खरे नाही, शासन निर्णयानुसार महाराष्ट्रात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य असलेली व्यक्ती ही स्थानिक व्यक्ती म्हणून समजली जाते. सदर व्यक्तीकडे सक्षम महसूल प्राधिका-यांने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र/सक्षम प्राधिका-यांने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा राज्यात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य असल्याचे सिद्ध करणारी इतर प्रमाणपत्र/मिळकत कर भरल्याबाबतची कागदपत्रे असावीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डागा रुग्णालय (नागपूर) येथील गर्भवती स्त्रीयांना तपासणीसाठी वारंवार मेयो रुग्णालय सुचविल्याबाबत**

(२) **२६९९** (८-४-२०१५). **श्री. अनिल सोले, श्री. नागो गाणार, श्री. मितेश भांगडिया** : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) डागा रुग्णालय (नागपूर) येथील गर्भवती स्त्रीयांना तपासणीसाठी मेयो रुग्णालयामध्ये वारंवार जावे लागते, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, गर्भवती स्त्रियांना होणारा त्रास थांबविण्यासाठी शासनातर्फे काय उपाययोजना करण्यात येत आहे ;

(३) असल्यास, डागा रुग्णालय येथे संबंधीत विभागात यंत्रणा सामुग्रीची सुविधा करण्यासाठी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** (१७-८-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे. सन २०१४-१५ मध्ये २४६० रुग्णांपैकी २६८ रुग्णांना संदर्भीत केले होते.

(२) व (३) गर्भवती स्त्रियांच्या तपासणी करीता लागणारे कलर डॉपलर मशीन डागा रुग्णालय येथे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१४ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाकडून मान्यता मिळाल्यानुसार १०० खाटांचे एम.सी.एच. विंग साठीचे बांधकामाचे आराखडे मा. अभियान संचालक, यांचे स्तरावर कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेले आहेत.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्त्वावर सोनोलॉजिस्ट नियुक्त करण्यात आलेले आहेत. व नियमित क्ष-किरण तज्ञ कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**समुद्रकिना-याच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सागरी पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत**

(३) **४४९९** (९-४-२०१५). **श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) मुंबईवर २६/११ ला झालेला दहशतवादी हल्ला आणि अलिकडेच तटरक्षक दलाने पकडलेली पाकिस्तानाहून स्फोटके भरून आलेली बोट या पार्श्वभूमीवर भाईंदर ते पालघर, डहाणू व झाई या समुद्रकिना-याच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सागरी पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या निवेदनातील मागणीवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२५-८-२०१५) : (१) होय हे खरे आहे.

(२) दिनांक १७ जून, २०१४ च्या अधिसूचनेनुसार ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी पासून पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन पोलीस अधिक्षक, पालघर कार्यालय कार्यान्वित झालेले आहे. नवीन पालघर जिल्ह्यात वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा आणि विक्रमगड या तालुक्यांच्या समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे नवीन सागरी पोलीस आयुक्तालय निर्माण करणे उचित होणार नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्ट्या विकासापासून वंचित असल्याबाबत**

(४) **४५४९** (९-४-२०१५). **श्री. जगन्नाथ शिंदे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) मुंबईतील सुमारे ७ टक्के लोकसंख्या झोपडपट्टी भागात राहत असून या झोपडपट्टींना सर्वप्रकारच्या सुविधा महानगरपालिकेतर्फे पुरविल्या जात असून त्यासाठी दरवर्षी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात दिडशे ते दोनशे कोटी रुपयांची तरतूद करुन विकासाच्या योजना राबविल्यानंतरही प्रत्यक्षात झोपडपट्ट्या विकासापासून वंचित राहिल्या असून भकास स्थितीत आहेत, हे खरे आहे काय;

(२) झोपडपट्ट्यांसाठी सर्व विकास कामे एकत्रितपणे राबविण्याचा महानगरपालिकेने निर्णय घेतला असून महानगर क्षेत्रातील ट्रॉम्बे, गोवंडी येथे पायलट प्रोजेक्ट राबविण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठरविले आहे, हे ही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदरहू पायलट प्रोजेक्टचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (४-८-२०१५) : (१) मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये विविध प्रकारच्या सेवासुविधा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात महसुली तसेच भांडवली खर्चासाठी तरतुदी करण्यात येतात. झोपडपट्ट्यांमधील विविध रस्ते व पदपथांच्या सुधारणा, सार्वजनिक शौचालये/शौचकुपे यांच्या दुरुस्त्या तसेच गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणा इत्यादीसाठी सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे रु. १०२.७० कोटी रु. ८५.७६ कोटी, रु. ८८.६५ कोटी, रु. १४२.७६ कोटी व रु. १६६.११ कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे. त्यानुसार झोपडपट्ट्यांचा विकास अप्याटप्प्याने होत असल्याचे दिसून येते. तसेच सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात झोपडपट्ट्यांच्या विविध दुरुस्त्यांच्या महसुली खर्चासाठी रु. १०६.०६ कोटी तर भांडवली खर्चासाठी एकात्मिक गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमासाठी केलेल्या रु. १० कोटीच्य विनिर्दिष्ट तरतुदीसह एकूण रु. १०६.८५ कोटीची तरतूद केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मानखुर्द येथे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मानखुर्द (पूर्व) येथील महाराष्ट्र नगर येथील झोपडपट्टीमध्ये प्राथमिक स्वरुपात मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सामायिक गल्ल्या, सार्वजनिक शौचालये, छोट्या नाल्यांची दुरुस्ती इत्यादी कामे करण्यात येणार आहेत.

**महाराष्ट्रात गत सहा वर्षात तब्बल २६ हजार ५३७ व्यक्तींनी स्वेच्छेने केलेले धर्मातर**

(५) **४६०६** (९-४-२०१५). **डॉ. निलम गो-हे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) महाराष्ट्रात गत सहा वर्षात तब्बल २६ हजार ५३७ व्यक्तींनी स्वेच्छेने धर्मांतर केल्याची माहिती गृह विभागाने एका अहवालाद्वारे राज्य शासनाला नुकतीच दिली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या अहवालातील माहितीनुसार धर्मांतराकरिता कोणतीही जबरदस्ती वा अमिषाची एकही घटना घडली नाही, हे ही खरे आहे काय ;

(३) असल्यास, राज्यातील एखाद्या व्यक्तींला स्वेच्छेने धर्मांतर करावयाचे असल्यास यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१४-९-२०१५) : (१) होय. महाराष्ट्रात गेल्या सहा वर्षात २६,६१६ व्यक्तींनी स्वेच्छेने धर्मांतर केले आहे.

(२) याबाबत राज्यात ३ घटना घडल्या आहेत.

(३) भारतीय राज्य घटनेनुसार सर्व नागरिकांस धार्मिक स्वातंत्र्य आहे.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये ६५४ कोटीच्या बी. एस. यु. पी.**
**योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याबाबत**

(६) **४७७८** (१०-४-२०१५). **श्री. जयवंतराव जाधव, श्री. नरेंद्र पाटील, श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. अनिल भोसले, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय गृहनिर्माण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये ६५४ कोटीच्या बी. एस. यु. पी. योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे ;

(२) तसेच सदर महानगरपालिकेच्या नाकर्तेपणामुळे तिस-या टप्प्यातील मंजुर घरे रद्द करुन केंद्र शासनाला व्याजासह निधी परत करण्याची नामुष्की महानगरपालिकेवर ओढवली, हे ही खरे आहे काय ;

(३) तसेच, उक्त भ्रष्टाचाराबाबतच्या आरोपांची केंद्रिय गुन्हे अन्वेषण विभागाने चौकशी करण्याची पोलीस आयुक्तांनी शासनाला शिफारस केलेली आहे, हे ही खरे आहे काय ;

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय ;

(५) असल्यास चौकशीला काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता** (११-९-२०१५) : (१) जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियांनाअंतर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा" या उपअभियानाखाली कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या एकूण रुपये ६५४.४६ कोटी प्रकल्प किंमतीच्या १३४६९ घरकुलांच्या एकूण ४ प्रकल्पांना केंद्र शासनाने सन २००७ ते २०१० दरम्यान मंजूरी दिलेली आहे. या प्रकल्पांसंदर्भात ठेकेदारांना नियमबाह्य अग्रीम अदायगी, लाभार्थी निवड, खाजगी जागांवर बांधकाम इ. प्रकारच्या तक्रारी सन २०१२ पासून प्राप्त झाल्या. या प्रकरणाबाबत पोलिस आयुक्त,

ठाणे यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी पोलिस महासंचालकामार्फत गृह विभागाकडे प्रस्ताव पाठविले. त्या अनुषंगाने सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यचे गृह विभागाने दिनांक ९ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभागास कळविले आहे. या प्रकरणातील तक्रारींबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रीमिनल रिट पिटीशन क्र. ३७४९/२०१२ व जनहित याचिका क्र. १२६/२०१२ दाखल झाल्या होत्या. यापैकी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. ३७४९/२०१२ मा. उच्च न्यायालयाने निकाली काढली असून जनहित याचिका क्र. १२६/२०१२ हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) कल्याण डोंबिवली येथील एकूण मंजूर १३४६९ घरकुलांपैकी ५२८१ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. या रद्द घरकुलांसाठी शासनाकडून प्राप्त अनुदान व्याजासह शासनाला परत करणे क्रमप्राप्त आहे.

(३), (४) व (५) वर नमूद केल्याप्रमाणे गृह विभागाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्याचा निर्णय दिनांक ९ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये कळविला असून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

---

## नाशिक पोलीस आयुक्तालय अंतर्गत सात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्यासाठी पोलीस आयुक्त नाशिक यांनी शासनास सादर केलेला प्रस्ताव

(७) **४८१५** (९-४-२०१५). **श्री. जयवंतराव जाधव, श्री. नरेंद्र पाटील, श्री. हेमंत टकले, श्री. अनिल भोसले** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) नाशिक पोलीस आयुक्तालयाअंतर्गत सात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्यासाठी पोलीस आयुक्त नाशिक यांनी शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय;

(२) तसेच नाशिक पोलीस आयुक्तालयातील १ अतिरिक्त पोलीस आयुक्त, पाच सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्यासह अधिकारी वर्गाची बहुतांश पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ;

(३) सदर जे. जे. शासकिय रुग्णालयातील विविध संवर्गातील रिक्त पदे विनाविलंब भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१२-८-२०१५) : (१) व (२) अंशतः खरे आहे.

(२) पोलीस अधिक्षक, नाशिक शहर यांचे अधिनस्त शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये पंचवटी पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नविन म्हसरुळ पोलीस ठाणे व भद्रकाली पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन गुंबई नाका पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत शासनाकडून मान्यता मिळालेली असून दिनांक ३ जून, २०१५ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## ठाणे महानगरपालिकेच्या घरगुती स्तरावरील पाणी वापराच्या स्वयंचालित जलमापके (मीटर) योजनेबाबत

(८) **५५०९** (९-४-२०१५). **ॲड. निरंजन डावखरे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) ठाणे महानगरपालिकेने सन २०१४-१५ यावर्षी ठाणे, कळवा व मुंब्रा या भागातील घरगुती स्तरावरील पाणी वापर मोजण्यासाठी ए. एम. आर. पद्धतीची स्वयंचलित जलमापके (मीटर) बसविण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्याकरिता ठाणे महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निमाण (JNNURM) अभियानांतर्गत रुपये १७१ कोटी रकमेचा प्रस्ताव गतवर्षी केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला असता, केंद्र शासनाने सदर प्रस्ताव नामंजूर केला असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ;

(३) असल्यास, स्वयंचलित मीटरच्या बाजारातील प्रत्यक्षातील किंमतीपेक्षा अवास्तव किंमती दर्शवून प्रस्ताव सादर केल्याने, सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात येत असल्याचे केंद्र शासनाकडून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ठाणे महापालिकेस कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय ;

(४) असल्यास, याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे व त्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२५-८-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. ठाणे महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निमाण अभियानांतर्गत रुपये १७१ कोटी रकमेचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुषंगाने केंद्र शासनाने सीपीएचईईओ या संस्थेमार्फत एएमआर जलमापकांची किंमत जास्त असल्याने त्याऐवजी कमी किंमतीची मेकॅनिकल मीटर्स बसविण्याची सूचना दिनांक १६ मे, २०१३ चे पत्रान्वये केली आहे.

(४) ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रथम टप्प्यात व्यावसायिक तसेच इमारतींसाठी असलेल्या २५ मी. मी. व त्यावरील व्यासाच्या घरगुती नळ संयोजनांवर १५ ते ३०० मी. मी. व्यासाची आयएसओ/ई.ई.सी. सेमी ॲटोमॅटीक मेकॅनिकल मिटर बसविण्याचे प्रस्तावित आहे.

---

## महाराष्ट्रात जादुटोणाविरोधी कायदा लागू करुनही राज्यात सरासरी महिन्याला एक नरबळी दिला जात असल्याबाबत

(९) **५७१०** (१०-४-२०१५). **श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) पुरोगामी महाराष्ट्रात जादुटोणाविरोधी कायदा आणून सर्वसामान्यांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न होत असतानाच राज्यात सरासरी महिन्याला एक नरबळी जात असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्यातील नरबळी थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२६-८-२०१५) : (१) सन २०१४ मध्ये राज्यात वर्धा शहरात नरबळीचा एक गुन्हा दाखल आहे.

(२) अंधश्रद्धा निमुर्लनाबाबतचा अध्यादेश २६ ऑगस्ट, २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला असून, डिसेंबर २०१३ पर्यंत एकूण ३५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती. त्यामध्ये ३२ गुन्हे उघडकीस आले असून ७६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सन २०१४ मध्ये १०७ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यामधील १०१ गुन्हे उघडकीस आलेले आहेत व ३०९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. जानेवारी २०१४ मध्ये ११ गुन्ह्यांची नोंद झाली असून जानेवारी २०१५ मध्ये ०५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

जादूटोणा विरोधी कायदा अंमलबजावणी अधिक सक्रियतेने होण्याबाबत राज्यातील सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी संपर्क साधून जादूटोणा विरोधी कायदा अंमलबजावणी अधिक सक्रियतेने होण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोलीस पाटील संघटनेच्या विविध मागण्या मंजूर करण्याचा शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव**

(१०) **६०६१** (९-४-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) पोलीस पाटील संघटनेच्या विविध मागण्या मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, ह्या संघटनेच्या मागण्याचे स्वरुप काय आहे व त्या तातडीने मंजूर करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत;

(३) अद्याप, याबाबत कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्यास त्याची कारणे काय आहेत व यासंदर्भातील सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१४-९-२०१५) : (१), (२) व (३) पोलीस पाटील संघटनेकडून, लोकप्रतिनिधींकडून संघटनेच्या मागण्यांबाबत प्राप्त निवेदनांवर तत्कालिन मा. मंत्री (गृह), मा. राज्यमंत्री (गृह) यांच्याकडे संघटनेच्या पदाधिका-यांसह विभागाच्या अधिका-यांसोबत जून, २०१४ मध्ये स्वतंत्रपणे बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच दिनांक १८ मे, २०१५ रोजी प्रधान सचिव (विशेष) यांच्याकडे देखील यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. पोलीस पाटील संघटनेच्या मागण्या ह्या आर्थिक व सेवाविषयक बाबींसंबंधी आहेत. या बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयांनुसार विभागाकडून मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

---

**नाशिक जिल्ह्यात मालेगाव, वडगांव तसेच नविन नाशिक भागातील कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याबाबत**

(११) **६११७** (२८-४-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) नाशिक जिल्ह्यात मालेगाव आणि नाशिक येथे नविन नाशिक भागासह अनेक शहरात गत तीन महिन्यात पिसाळलेल्या कुत्र्यांचा उच्छाद मोठ्या प्रमाणात वाढून अनेकांना चावा घेऊन गंभीर जखमी केल्याच्या घटना घडल्यात, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, मालेगाव तालुक्यात वडगांव येथे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पिसाळलेल्या कुत्र्यांची तब्बल १७ जणांना चावा घेतला व जखमी केले, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, नविन नाशिक भागात पिसाळलेल्या कुत्र्यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास धुमाकुळ घालत अठरा जणांना चावा घेतल्याची घटना घडली, तर मालेगांव येथेही गत दोन-तीन महिन्यात अनेकांना पिसाळलेल्या कुत्र्यांनी जखमी केले, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, भटक्या मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी महानगरपालिकेच्यावतीने भटक्या कुत्र्यांवर निर्बीजीकरण करण्याची प्रक्रिया केवळ कागदावरच असल्याची तक्रार नागरीकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, निर्बीजीकरणाचा आकडा आणि कुत्र्यांची संख्या दोन्हीतही वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाने एकूण बाबींची चौकशी केली आहे काय;

(६) जनतेचे धोक्यात आलेले आरोग्य विचारात घेता याप्रकरणी शासन कोणती विशेष उपाययोजना करीत आले वा करणार आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (६-८-२०१५) : (१), (२) व (३) वडगांव, ता. मालेगांव येथील दोन व्यक्तींना पिसाळलेला कुत्रा चावल्याची घटना घडली असून, नविन नाशिक विभागात पिसाळलेल्या श्वानाने आठ जणांना चावा घेतला, यासंदर्भात तातडीची कार्यवाही म्हणून, नाशिक महानगर पालिकेमार्फत म्हणून पिसाळलेल्या श्वानास पकडण्यात आले आहे.

(४), (५) व (६) याबाबत नाशिक महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाली नाही. मात्र, नाशिक महानगरपालिका हद्दीत मोकाट व भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी (Animal Welfare Board of India) या मान्यता प्राप्त संस्थेमार्फत निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्याचे कामकाज करण्यात येते. सदर संस्थेमार्फत महानगरपालिका हद्दीतील मोकाट व भटके कुत्रे दैनंदिन पकडले जातात. तसेच यामध्ये नागरीक व सामाजिक संस्था यांचा सहभाग घेण्यात येतो.

---

**बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर असलेली वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याबाबत**

(१२) **६१४४** (८-४-२०१५). **श्री. विक्रम काळे** : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) बीड जिल्ह्यात १०७ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून त्यासाठी केवळ ७३ डॉक्टर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत;

(३) तसेच जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरळीत चालावा म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर असलेली वैद्यकीय अधिका-यांची पदे भरून प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरळीत चालावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** (२५-८-२०१५) : (१) नाही, बीड जिल्ह्यामध्ये एकूण ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असून सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची १०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८१ स्थायी व ११ बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, एप्रिल-मे २०१५ मध्ये बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात १० वैद्यकीय अधिका-यांना पदस्थापना देण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) स्वतंत्र निवड मंडळामार्फत शिफारसप्राप्त उमेदवारांमधून एप्रिल-मे, २०१५ मध्ये १० वैद्यकीय अधिका-यांना बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात पदस्थापना देण्यात आल्या आहेत. तसेच वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पद्धतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणे बाबत**

(१३) **६२६९** (९-४-२०१५). **श्री. अमरसिंह पंडीत, श्री. धनंजय मुंडे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी समिती गठीत केल्याची बाब दिनांक १७ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने जनतेपुढे सादर केलेल्या रिपोर्ट कार्ड मध्ये नमुद केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त समितीने स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत;

(३) समितीचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे काय, स्व. ठाकरे यांच्या स्मारकाचे काम केव्हा सुरु होणार आहे;

(४) नसल्यास, स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (९-१०-२०१५) : (१) मा. मुख्यमंत्री यांच्या कारकिर्दीला १०० दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शासनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेमध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी समिती गठीत केली असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) समितीने स्मारकासाठी ८ जागांची पाहणी करुन त्यापैकी मुंबई महापौरांचा बंगला या जागेची शिफारस केली असून अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. प्रस्तुत अहवालावर शासनाचा निर्णय झाल्यानंतर स्मारकाच्या कामाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**नांदेड येथील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी जाळणा-या तरुणांविरुद्ध करावयाची कारवाई**

(१४) **६४९९** (१०-४-२०१५). **श्री. अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) नांदेड येथील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या तीन ठिकाणी घरासमोर उभ्या करुन ठेवलेल्या तीन दुचाक्या जाळणा-या आनंदनगर भागातील तरुणांविरुद्ध पोलीसांनी गुन्हा नोंदविला असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणविस** (९-९-२०१५) : (१) सदरची घटना दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ सकाळी ४.०० वाजता घडली असून प्रकरणी दिनांक १० फेबुवारी, २०१५ रोजी विमानतळ पोलीस ठाणे नांदेड येथे गु.र.न. ३१/२०१५, गु.र.न. ३२/२०१५, गु.र.न. ३३/२०१५ भा.दं.वि. कलम ४३५, ४२७, ५११ प्रमाणे ३ गुन्हे दाखल आहेत.

(२) दाखल गुन्ह्याचा तपास १ आरोपीने दुचाकी जाळल्या असून त्यामध्ये रु. २,०००, रु. ४५,००० व रु. ७०,००० असे एकूण १,१७,००० चे नुकसान केल्याचे आढळुन आले आहे.

प्रकरणी एक आरोपी निष्पन्न असून त्यास अटक करुन न्यायालयीन कोठडी देण्यात आली. सदरच्या गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## बाम्बे स्टॉक एक्सचेंजने (बीएसई) विदर्भातील १०,००० युवकांना आर्थिक प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शवल्याबाबत

(१५) **६५९७** (२१-४-२०१५). **प्रा. जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) बाम्बे स्टॉक एक्सचेंजने (बीएसई) विदर्भातील १०,००० युवकांना आर्थिक प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शवली असुन याबाबत प्रस्ताव दिल्यास राज्य शासन त्याकरिता गुंतवणूक करण्यासंदर्भात विचार करण्याबाबतचे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मनी बी इंस्टिट्युट, नागपूर महानगर पालिका एल ॲड टी व सीडीसीएल यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या वेळी दिले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, अनु. जाती मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थाचा उक्त प्रस्तावात समावेश करण्यात येईल काय;

(३) असल्यास, प्रश्न भाग एक व दोन बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (११-८-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## जळगांव शहरात महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे महेरुण मधील गुलाब बाबा नगरात चार मजल्याच्या दोन इमारती अवैधपणे बांधण्यात आल्याबाबत

(१६) **६६२६** (१०-४-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) जळगांव शहरात महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे महेरुण मधील गुलाब बाबा नगरात चार मजल्याच्या दोन इमारती अवैधपणे बांधण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने उपरोक्त अवैध इमारतीवर कोणती कार्यवाही केली आहे;

(३) या प्रकरणाची अद्यापही चौकशी पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडवणीस** (६-८-२०१५) : (१) मौजे मेहरुण सर्व्हे नं. ५२४, प्लॉट नं. ११ व १७ या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम झाल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे.

(२) व (३) प्राथमिक चौकशी अंती स. नं. ५२४, प्लॉट नं. ११, सि. स. नं. ४९८४ येथील इमारतीच्या तळमजला अधिक तीन मजल्याच्या बांधकामास दिनांक १६ एप्रिल, २०१३ अन्वये बांधकाम परवानगी दिली असता, काही अनधिकृत बांधकाम केले असल्याचे आढळले. या प्रकरणी संबंधितास सुनावणी देऊन दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी सदर अनधिकृत बांधकाम हे बांधकामधारक यांनी काढून घ्यावे असे आदेशीत केले होते. त्यानंतर सदरचे अनधिकृत बांधकाम बांधकामधारकाने स्वतःहून काढले आहे.

प्लॉट क्र. १७ मधील इमारतीचे संपूर्ण बांधकाम अनधिकृत असल्याने महानगरपालिकेने दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ अन्वये सदरचे बांधकामास अनधिकृत ठरवून बांधकामाची नोटीस दिली होती. या प्रकरणी सुनावणी घेऊन दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी आदेश पारीत करुन अनधिकृत बांधकामधारक यांना ३० दिवसामध्ये बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश पारीत केले होते. त्या अनुषंगाने भुखंडमालक यांनी बांधकाम परवानगीचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला असून त्याची छाननी महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

---

## राज्यात सैनिक कल्याण अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(१७) **६७९७** (६-८-२०१५). **श्री. आनंद ठाकूर, श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. राहूल नार्वेकर** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात सैनिक कल्याण अधिका-यांची २० पदे रिक्त असून ५ अधिकारी लवकरच निवृत्त होत असल्याची बाब माहे मार्च २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या प्रश्नावर मा. पालकमंत्री महोदयांनी शासकीय विश्रामगृहावर माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान बैठक घेऊन माजी सैनिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय;

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत व माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोतणी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१६-९-२०१५) : (१) हे खरे नाही. माहे मार्च, २०१५ मध्ये एकूण १२ जिल्हा सैनिक कल्याण अधिका-यांची पदे रिक्त होती.

(२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), मुख्याधिकारी (नगरपरिषद सावंतवाडी) व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्यासह दिनांक ७ मार्च, २०१५ रोजी बैठक संपन्न झाली. बैठकीत विविध मागण्यांवर झालेल्या चर्चेअंती उचित कार्यवाहीचे निदेश संबंधितांस देण्यात आले आहेत.

(४) व (५) रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासन स्तरावर उचित कार्यवाही करण्यात येत असून माजी सैनिकांच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने संबंधित विभाग/कार्यालयांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**यवतमाळ पंचायत समितीमधील उशिरा येणा-या कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत**

(१८) **६९३८** (३-८-२०१५). **श्री. राजेंद्र मुळक, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर, श्री. हरिसिंग राठोड, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) यवतमाळ पंचायत समितीमधील अधिक्षकासह दहा कर्मचारी वेळेवर कामावर येत नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास,उशिरा येणा-या कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१५-९-२०१५) : (१), (२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी पंचायत समिती यवतमाळ कार्यालयाला दिनांक १५-४-२०१५ रोजी आकस्मिक भेट दिली असता भेटी दरम्यान एकूण १२ कर्मचारी उशिरा उपस्थित झाले असल्याचे निदर्शनास आले.

सदर उशिरा उपस्थित झालेल्या कर्मचा-यांचे माहे एप्रिल, २०१५ चे वेतनातून १ दिवसाचे वेतन कपात करण्यात आले आहे. पंचायत समिती, यवतमाळ येथील अधिकारी/कर्मचा-यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थिती राहणेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती यवतमाळ यांनी दिनांक १६-४-२०१५ रोजी परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत.

---

**सोलापूर जिल्ह्यामधील गावांचा विकास करण्यसाठी नवीन ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत**

(१९) **७००१.** (३१-७-२०१५). **श्री. रामहरी रुपनवर, श्री. संजय दत्त, श्री. राजेंद्र मुळक, श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. हरिसिंग राठोड, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) सोलापूर जिल्ह्यातील ५०० लोकसंख्या असलेल्या अनेक वाड्या-वस्त्या-तांड्यांचा विकास झालेला नसल्याने याबाबत जि. प. सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नविन ग्रामपंचायत करावयाची गावे व ठिकाणे यासंबंधीचे निवेदन मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, नविन ग्रामपंचायत होणे अत्यंत आवश्यक असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (८-१०-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार ज्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे ते क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) नुसार स्वतंत्र महसुली गाव म्हणून जाहीर झालेले असले पाहिजे.

तसेच, स्वतंत्र ग्रामपंचायत करावयाच्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागांसाठी किंवा दोन गावात ३ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असल्यास लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे. प्रकल्पामुळे पुनर्वसित ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी लोकसंख्या किमान ३५० ते १००० असणे आवश्यक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्यातील वाड्या, वस्त्या, तांडे येथे नविन ग्रामपंचायती स्थापन करणेबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ च्या शासनपत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून करण्यात येणा-या कार्यवाहीच्या स्वरुपाबाबत**

(२०) **७०५१** (६-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. रामहरी रुपनवार, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले आहेत काय;

(२) असल्यास, केव्हा व प्रयत्नांचे स्वरुप आणि फलनिःष्पत्ती काय आहे;

(३) उक्त प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न करण्यात आले नसल्यास, केव्हा पर्यंत करणे अपेक्षित आहे;

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (७-९-२०१५) : (१) व (२) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यासाठी अभ्यसगटाची नियुक्ती करुन सर्वमान्य तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्या अनुषंगाने दिनांक २-५-२००० रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली. सीमाप्रश्न सामंजस्याने सोडविण्यासाठी केंद्र शासन व कर्नाटक शासन यांच्याशी विविध पातळीवरुन निकराचे प्रयत्न करुनही यश न आल्याने, दिनांक ६-११-२००२ च्या बैठकीत उच्चधिकार समितीने मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची शिफारस केली. दिनांक १२-२-२००३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत शिफारस मान्य करण्यात आली. न्यायिक प्रकरणात सल्ला देण्यासाठी प्रा. एन. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३-३-२००३ रोजी तज्ञ समिती स्थापन करण्यात आली.

यानंतर महाराष्ट्र शासनाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १३१(ब) अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक २९-३-२००४ रोजी दावा क्र. ४/२००४ दाखल केला आहे. दाव्यात महाराष्ट्र राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी ८ अनुभवी व निष्णात वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. दिनांक १३-१२-२०१२ रोजी झालेल्या सुनावणीत वादाचे मुद्दे निश्चित करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाने एकूण ५ मुद्यांवर तज्ञ साक्षीदारांच्या नियुक्त्या केल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२-९-२०१४ रोजी दाव्यातील साक्षीपुरावे तपासण्यासाठी मा. कोर्ट कमिश्नर यांची नियुक्ती केली आहे. न्यायालयीन आदेशांच्या पार्श्वभूमीवर मा. मुख्य सचिव यांनी दिनांक १८-९-२०१४ व दिनांक १३-११-२०१४ रोजी आढावा बैठका घेऊन कार्यवाहीचे निदेश दिले आहेत.

त्यानुसार दाव्याचे कामकाज गतिमानतेने होण्यासाठी जुने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे वकील महोदयांसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून दिनांक ८-१-२०१५ रोजी तेथे एक विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. वकील महोदयांच्या सहाय्यासाठी तसेच पुरावे उपलब्ध करण्यासाठी दिनांक २२-१-२०१५ रोजी कनिष्ठ सहायक वकील यांची नियुक्ती विशेष कक्षात करण्यात आली असून दिनांक १-१-२०१५ रोजी Trial Lawyer यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. कोर्ट कमिशनर यांच्यापुढे दिनांक ८-११-२०१४ व दिनांक ९-१-२०१५ रोजी सुनावण्या झाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचे वकील महोदयांकडून साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी साक्षीदारांची तयारी व त्यानुषंगाने आवश्यक कागदपत्रे गोळा करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यासाठी वकीलाच्या नवी दिल्ली व पुणे येथे सातत्याने बैठका होत आहेत.

तसेच मूळ दाव्याची दिनांक ९-१-२०१५ रोजी सुनावणी झाली असता तीन सदस्यीय खंडपीठापुढे प्रकरण चालविण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

सीमावादीत भागातील मराठी भाषिकांवर होणा-या अन्यायाबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ३०-६-२०१५ च्या पत्रान्वये मा. पंतप्रधान यांना अवगत केले असून सदर पत्राची मा. पंतप्रधान यांनी दखल घेतली आहे.

सीमावादीत भागातील मराठी भाषिकांवर होणा-या अन्यायाच्या घटना निदर्शनास आणून तेथे Status Quo स्थिती राखण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयास विनंती करणारा इंटरलोकुटरी अर्ज दिनांक १४-७-२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाकडून दाखल करण्यात आला आहे. त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश अपेक्षित आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पुणे महानगरपालिके तर्फे शहरात वेगवेगळ्या ठिकाणी २० पाळणाघरे सुरु करण्याचा घेतलेला निर्णय**

(२१) **७०५३** (६-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त, श्री. हरिसींग राठोड, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. रामहरी रुपनवर** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) पुणे महानगरपालिकेतर्फे शहरात वेगवेगळ्या ठिकाणी २० पाळणाघरे सुरु करण्याचा निर्णय गतवर्षी घेण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास,शहरातील नोकरदारांची गरज असलेली पाळणाघरे सुरु करण्याबाबत पालिकेने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१-१०-२०१५) : (१) पुणे महानगरपालिकेतर्फे सन १९९४ पासून वयोगट ३ महिने ते ५ वर्षापर्यंतच्या मुलांना अल्प दरात त्यांची देखभाल करण्यात येते. पुणे महानगरपालिका हद्दीतील ३ उपलब्ध जागेवर तसेच स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने जागेच्या उपलब्धतेनुसार पाळणाघर सुरु करण्यचे प्रस्तावित आहे.

(२) पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे शहरातील नोकरदार व कामगार महिलांच्या मुलांसाठी पाळणाघर सुरु करण्यासाठी प्रशासनाने महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील जिल्हा परिषेत कार्यरत प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी राहण्याबाबत**

(२२) **७५९८** (३-८-२०१५). **डॉ. सुधीर तांबे, श्री. सतीष चव्हाण, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यातील जिल्हा परिषदेत कार्यरत प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी राहणे सक्तीचे केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, यामुळे शिक्षकांचे विशेषतः महिला शिक्षकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, ही अट शिथील करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१४-९-२०१५) : (१) नाही.

(२), (३) व (४) राज्यातील ग्रामीण क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोणातून पंचायत राज व्यवस्था निर्माण केलेली आहे. या व्यवस्थेच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषद कर्मचा-यांनी त्यांच्या मुख्यालयी वास्तव्य करणे आवश्यक आहे. तथापि कर्मचा-याचे मुख्यालयी वास्तव नसल्याने विधीमंडळाच्या पंचायत राज समितीद्वारा वारंवार नाराजी प्रकट करण्यात आली आहे.

यास्तव सर्व जिल्हा परिषद कर्मचा-यांना मुख्यालयी राहणे अनिवार्य असून प्रस्तुत अट शिथिल करण्यात आलेली नाही.

---

**कर्जत तालुक्यातील कर्जत-मुरबाड रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी वन विभागाची जमीन मिळण्याबाबत**

(२३) **७६०७** (३१-७-२०१५). **श्री. हरिसींग राठोड, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री. रामहरी रुपनवर** : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) कर्जत तालुक्यातील कर्जत-मुरबाड ३५ कि.मी. रस्त्याचे रुंदीकरण करताना रस्ता १० मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्याचे नियोजन आहे, तथापि, काही ठिकाणी रस्त्याकडेला असलेली जमीन वनविभागाच्या मालकीची असल्याने वनविभाने तेथे रुंदीकरण करु न दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या रुंदीकरणासाठी वनविभागची जमिन मिळावी यासाठी सादर करण्यात आलेल्या भूसंपादन प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (१८-९-२०१५) : (१) व (२) कर्जत-मुरबाड रस्त्याचे रुंदीकरणाकरीता आवश्यक वनजमिन मागणीचा प्रस्ताव, प्रकल्प यंत्रणेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अद्याप पर्यंत वन विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात जाती निहाय जनगणनेमध्ये आर्थिक निकषानुसार दारिद्र्यरेषेखालील नागरीकांची माहिती मिळण्याबाबत

(२४) **७६०८** (३१-७-२०१५). **श्री. हरिसींग राठोड, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यातील ग्रामीण विभागामार्फत सन २०११ पासून सुरु असलेल्या जाती निहाय जनगणनेमध्ये आर्थिक निकषानुसार दारिद्र्यरेषेखालील नागरीकांची संख्या किती आहे. तसेच जनगणनेसाठी केंद्र शासनाने किती निधी दिला व त्यापैकी राज्य शासनाकडून किती निधी खर्च करण्यात आला याची माहिती अद्यापी उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तपशीलवार माहिती उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१५-९-२०१५) : (१), (२) व (३) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंब निश्चित करण्याकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व प्राप्त प्रश्नावलीनुसार राज्यात सामाजिक, आर्थिक व जात निहाय जनगणना २०११ करण्यात येत आहे. आता या प्रक्रियेतील प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असुन या सर्वेक्षणाची प्रारुप यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारुप यादीतील माहितीबद्दल दावे व आक्षेप स्वीकारण्यात आलेले आहेत. प्राप्त दावे व आक्षेत निकाली काढण्यात आले असून त्याबाबतची माहिती अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वेक्षणाची परिपूर्ण माहिती केंद्र शासनास सादर करण्यात येणार असून त्यानंतर केंद्र शासनाकडून दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे निश्चितीकरण होणार आहे.

या जनगणनेकरीता केंद्र शासनाकडून रु. १५५.५७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या निधी पैकी साधारणतः रु. १४८.०० कोटी इतका निधी राज्यास प्राप्त झालेला असून सदर निधी सर्व जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

---

### राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२५) **८५४१** (३१-७-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्याची आर्थिक स्थिती खालावलेली असून राज्यावर माहे मे, २०१५ च्या सुमारापर्यंत सुमारे रुपये ३ लाख ३३ हजार कोटींच्या वर कर्जाचा बोजा असून शासनाला कर्जाच्या व्याजापोटी सुमारे २७ हजार ६६३ कोटी रुपये द्यावे लागत आहेत, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे;

(३) राज्याची आर्थिक स्थिती सुधारावी व महाराष्ट्र राज्याची प्रगत राज्य म्हणून ओळख रहावी यासाठी कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत अथवा येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (९-९-२०१५) : (१) व (२) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाअखेर अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावरील कर्ज रु. ३,३३,१५९.९७ कोटी अपेक्षित आहे. कर्जाच्या निव्वळ व्याजापोटी सन २०१५-१६ वित्तीय वर्षात रु. २७,६६३ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(३) वित्त विभागाच्या दिनांक २ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतनावरील खर्चातील वाढ मर्यादित करण्यासंबंधी उपाययोजना निश्चित केली आहे.

- उद्योग क्षेत्रासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे.
- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करून सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- नगर विकास विभाग, महसूल विभाग, गृह निर्माण विभाग यांना अतिरिक्त महसूल वाढीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे.
- राज्याच्या वित्तीय स्थितीबाबत श्वेतपत्रिका प्रकाशित करण्यात आली आहे. त्यातील कार्यवाहीसाठी मांडलेल्या मुद्यांवर राज्याच्या खर्चाच्या नियंत्रणासाठी, आर्थिक सामाजिक विकासासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.
- सार्वजनिक प्रापण व्यवस्था पारदर्शक, किफायतशीर व कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.
- देशी अल्कोहोलिक मद्यावरील उत्पादन शुल्क पुनर्रचनेद्वारा रु. २०० कोटी अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

---

### मंत्रालयातील मागासवर्गीय उमेदवारांना सेवा ज्येष्ठतेसह पदोन्नती देण्याबाबत

(२६) **८८७०** (६-८-२०१५). **श्री. हरिसिंग राठोड, श्री. रामहरी रूपनवर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६(४) (क) नुसार मागासवर्गीय उमेदवारांना सेवा ज्येष्ठतेसह पदोन्नतीची तरतूद असूनही मंत्रालयातील ११ अवर सचिव व ४ उप सचिव या पदांवर अनु. जमातीच्या १५ अधिका-यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवाज्येष्ठता देऊन पदोन्नती नाकारण्यात आली असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत;

(३) तसेच, या अधिका-यांना पूर्वलक्षी प्रभावाने सेवा ज्येष्ठता देवून पुढील पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (४-९-२०१५) : (१) मंत्रालयातील अनुसूचित जमातीच्या अधिका-यांविरुद्ध न्यायालयीन प्रकरण सुरु असल्याचे पार्श्वभूमीवर ११ कक्ष अधिका-यांना अवर सचिव पदावर व ४ अवर सचिवांना उप सचिव पदावर पदोन्नतीबाबतचा उचित प्रस्ताव दिनांक ३० डिसेंबर, २०१३ रोजी सादर केला होता, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सीटी टॉवर्स को. ऑप. हौ. सोसायटी, नेरुळ, नवी मुंबई या प्रकरणी जमीन खरेदीत रु. ९२ लक्ष इतक्या शासकीय अनुदानाच्या गैरवापरासंदर्भात फौजदारी खटला ठाणे येथील न्यायालयात आदिवासी विकास विभागामार्फत दाखल करण्यात आला होता. त्यापैकी, १८ अधिकारी मंत्रालयीन संवर्गातील होते. १८ अधिका-यांपैकी २ अधिकारी/कर्मचा-यांना बडतर्फ केले असून १ अधिकारी निलंबित असतांना सेवानिवृत्त झाले आहेत. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, ६ वे न्यायालय, ठाणे यांनी दिनांक २८ मे, २०१३ रोजी फौजदारी खटल्यात दिलेल्या आदेशाविरुद्ध मा. सत्र न्यायालय, ठाणे यांच्याकडे क्रिमीनल अपिल क्र. ३३७/ २०१३ दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ठ आहे. फौजदारी खटल्यातील अपिलात पारित होणा-या अंतिम आदेशाच्या अधीन राहून, उप सचिव (३) व अवर सचिव (१०) पदावर दिनांक २७ जानेवारी, २०१४ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली. आर्थिक अनियमिततेबाबत दाखल फौजदारी खटल्यातील अपिलामध्ये होणा-या निर्णयानुसार या अधिका-यांना नियमित पदोन्नती किंवा मानीव दिनांक देण्याबाबत प्रचलित तरतूदीनुसार तपासणी करुन शासन कार्यवाही करणार आहे. सद्यःस्थितीत यातील काही अधिका-यांनी शासनविरुद्ध मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. २९६/२०१५ दाखल करुन, मानीव दिनांक व ज्येष्ठता अनुषंगिक लाभाची मागणी केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

### अमरावती जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेच्या यादीमध्ये फेरफार करणा-यांवर कारवाई करण्याबाबत

(२७) **८८७३** (३१-७-२०१५). **श्री. हरिसिंग राठोड, श्री. रामहरी रूपनवर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) अमरावती जिल्ह्यात दारिद्र्य रेषेच्या यादीमध्ये फेरफार करण्यात आलेल्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच दारिद्र्य रेषेखालील नागरीकांवर अन्याय करणा-या दोषींवर कारवाई करून कारवाईचा अहवाल मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती यांना दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे** (७-१०-२०१५) : (१) होय.

(२) व (३) पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत ग्रामपंचायत हिवरा (बु.), येथील दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणना २००२ च्या यादीमध्ये अपात्र कुटुंबांचा समावेश करुन पात्र कुटुंबांना वंचित ठेवल्या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांच्या स्तरावरुन सविस्तर चौकशी करण्यात आलेली आहे. यामध्ये दोषी आढळून आलेले कु. लीला गजभिये, तत्कालीन विस्तार अधिकारी (उद्योग) व श्री. डी. एल. लाखे, तत्कालीन ग्रामसेवक यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

## सावंतवाडीनजिक माजगाव ग्रामपंचायत मार्गावरील श्रीदेवी सातेरी जनरल स्टोअर्सच्या ऑटो हायड्रोलिक सर्व्हीस सेंटरला लागलेली आग

(२८) **८८८०** (३१-७-२०१५). **श्री. हरिसिंग राठोड, श्री. रामहरी रूपनवर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) सावंतवाडीनजिक माजगाव ग्रामपंचायत मार्गावरील श्रीदेवी सातेरी जनरल स्टोअर्स या धूरी बंधुच्या ऑटो हायड्रोलिक सर्व्हीस सेंटरला आग लागल्याने सुमारे ४० लाखाचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या आगीची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (८-१०-२०१५) : (१), (२) व (३) ग्रामपंचायत माजगाव येथील इमारत क्र. १२२० या इमारतीमधील ऑटो हायड्रोलिक सर्व्हीस सेंटरला दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी लागलेल्या आगीमुळे सुमारे ५३ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत गावचे तलाठी यांचेकडून पंचनामा करण्यात आला असून, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, सावंतवाडी यांचेकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

तथापि, महसूल विभागाच्या दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयानुसार दुकानाच्या झालेल्या आर्थिक नुकसानासाठी भरपाई देण्याची कोणतीही तरतुद नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरण नामंजूर करण्यात आले आहे.

---

## संगमेश्वर तालुक्याती वायंगणे या ग्रामपंचायतीच्या इतिवृत्तामध्ये झालेला गैरव्यवहार

(२९) **८९८७** (३-८-२०१५). **श्रीमती हुस्नबाबु खलिफे, श्री. संजय दत्त, श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) वायंगणे (ता. संगमेश्वर) या ग्रामपंचायतीच्या अनेक सभांचे इतिवृत्त लिहिलेलेच नाही, कामांसाठी निविदा न मागविताच त्यावर खर्च झालेला दाखविला आहे, अनेक ठरावांवर उपस्थित नसलेल्या सदस्यांच्या सह्या दाखविल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या उपरोक्त ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांची चौकशी करून शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे;

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१४-९-२०१५) : (१) होय.

(२) श्रीमती प्रणाली परशुराम घडशी यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) नुसार अपात्र करण्यासाठीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

श्री. विलास सोना जाधव, ग्रामसेवक ग्रामपंचायत वायंगणे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (१) नुसार ठपका ठेवण्याची कारवाई गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमेश्वर यांचेस्तरावर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

### नगरच्या (जि. अहमदनगर) बालसुधारगृहातून मुले पळून गेल्याबाबत

(३०) **९०६०** (३-८-२०१५). **डॉ. सुधीर तांबे, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री. संजय दत्त, श्री. राजेंद्र मुळक, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, श्री. सतिश चव्हाण, श्री. विक्रम काळे, श्री. रामहरी रूपनवर** : सन्माननीय महिला व बालविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) नगर (जि. अहमदनगर) बालसुधारगृहातून सहा मुले सुरक्षारक्षक कर्मचा-यांचे नाक-तोंड दाबून पळून गेल्याचे माहे ३१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, सदरील मुले पळून जाण्याची नेमकी कारणे काय, तसेच पळून गेलेल्या मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे काय;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (२८-९-२०१५) : (१) होय.

(२) होय.

(३) सदरची मुले ही गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील आहेत. अशा मुलांच्या पालकांशी संपर्क साधण्यात आला तथापि, मुलांना जामीन करून घेण्यास पालक इच्छुक नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळेच सदरची मुले पालकांकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पळून जाण्याची संधी पाहतात, व यातूनच पाणी मागण्याच्या बहाण्याने सुरक्षा रक्षकावर प्राणघातक हल्ला करून पळून गेलेली आहेत.

पोलिसांनी मुलांचा शोध घेतला असून पळून गेलेल्या पैकी १ मुलगा मृत सापडला असून उर्वरित मुलांपैकी १७ जून रोजी १ मुलगा व १६ जुलै, २०१५ रोजी ४ मुले सापडली असून त्यांना पुन्हा संस्थेत दाखल करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या मालकीच्या अंगणवाडी इमारती लगतची सागवन व काटेहासन झाडे विना परवाना तोडल्याबाबत

(३१) **९४४९** (३-८-२०१५). **श्री. नरेंद्र पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. संदिप बाजोरिया, श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. जयंत पाटील, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या मालकीच्या अंगणवाडी इमारती लगतची २ सागवान झाडे व ३ काटेहासन झाडे विना परवाना सन २०१३ मध्ये तोडल्या प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय;

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे** (८-१०-२०१५) : (१) हे खरे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या मालकीच्या अंगणवाडी इमारत परिसरात २ सागवन झाडे व ३ काटेहासन झाडे तोडण्यात आलेली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**उल्हासनगर (जि. ठाणे) येथील सुधारगृहातील महिलांना अपुरा आहार दिला जात असल्याबाबत**

(३२) **९५१४** (३-८-२०१५). **श्री. नरेंद्र पाटील, श्री. अनिल तटकरे, श्री. धनंजय मुंडे, श्री. संदिप बाजोरीया, श्री. किरण पावसकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. ख्वाजा बेग, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील** : सन्माननीय महिला व बाल विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) येथे असलेल्या सुधारगृहातील महिलांना अपुरा आहार दिला जात असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (७-१०-२०१५) : (१) नाही. उल्हासनगर (जि. ठाणे) येथील शासकीय महिला वसतिगृह (शांतीसदन महिला वसतिगृह) या संस्थेच्या अनुषंगाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयातील अधिका-यांनी संस्थेस भेट देवून चौकशी केली आहे. तसेच चौकशीअंती महिलांना शासन नियमानुसार पोटभर आहार दिला जातो असेही त्यांच्या निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मोठागाव-ठाकुर्ली-माणकोळी (जि. ठाणे) या खाडी पुल बांधण्याबाबत**

(३३) **९५४३** (६-८-२०१५). **डॉ. निलम गो-हे, ॲड. अनिल परब** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) ठाणे ते डोंबिवली हा रस्ता मार्ग करण्यासाठी मोठागांव-ठाकुर्ली-माणकोळी या खाडीवर पुल बांधण्यासाठी एमएमआरडीएन ने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) असल्यास, सदर मार्गाच्या बांधकामासाठी किती खर्च येणार आहे व सदर काम किती कालावधी पूर्ण करण्यात येणार आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२४-९-२०१५) : (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) माणकोली-मोटागांव रस्त्यावर मोटागांव येथे उल्हासखाडीवर ६ पदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत रक्कम रु. २४५ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. प्राधिकरणामार्फत प्रथम टप्प्यात मुख्य पुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर पुलाच्या बांधकामासाठी निविदा रक्कम रु. १९० कोटी इतकी असून सदर काम पूर्ण करण्याचा निविदा कालावधी ३६ महिने इतका आहे.

---

**डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) विवळवेढे ग्रामपंचायत सदस्याने आदिवासी घरकुल योजनेत केलेला गैरव्यवहार**

(३४) **९६१३** (३-८-२०१५). **श्री. आनंद ठाकूर, श्री. हेमंत टकले, श्री. राहूल नार्वेकर, श्री. ख्वाजा बेग, श्री. नरेंद्र पाटील** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) विवळवेढे ग्रामपंचायत सदस्य भिकू कृष्णा गिंबल यांनी आदिवासी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडून हजारोंची रक्कम घेऊन लाखोचा अपहार केल्याची तक्रार ग्रामस्थांनी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिका-यांच्या समोर दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय;

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय;

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१८-९-२०१५) : (१), (२) व (३) होय.

(४) श्री. भिकू कृष्णा गिंभल ग्रामपंचायत सदस्य, विवळवेढे हे दोषी आढळल्याने त्यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४ (ग) नुसार ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यासाठी तहसिलदार डहाणू यांचेकडे दिनांक ९ जुलै, २०१५ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला आहे. व त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे फासा येथे आय-७९/१५, दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गारमाळ (ता. खालापूर, जि. रायगड) येथील डोंगरमाथ्यावरील प्राणी व ग्रामस्थांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्याबाबत**

(३५) **९६५०** (३-८-२०१५). **श्री. जयंत पाटील** : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) मौजे गारमाळ (ता. खालापूर, जिल्हा रायगड) हे गाव डोंगरमाथ्यावर वसलेले असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्राण्यांची वस्ती असून उन्हाळ्यात प्राणी व ग्रामस्थ यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था गेली अनेक वर्षे वन विभागामार्फत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, गारमाळ येथे प्राण्यासाठी व ग्रामस्थांसाठी वन विभाग पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (२९-९-२०१५) : (१) व (२) मौजे गारमाळ ह्या गावातील लोकांना व प्राण्यांना पाणी पुरवठा करणे हे वनविभागाच्या कार्यकक्षेबाहेर आहे. तथापि वन्यप्राण्यांकरीता मौजे गारमाळ व आसपासच्या जंगल क्षेत्रात आढळून येणा-या वन्यप्राण्यांकरीता मौजे गारमाळ पासून अंदाजे २ ते ३ कि.मी. अंतरावरुन वाहत असलेल्या आंबा नदीत पाण्याची उपलब्धता असून पावसाळ्याच्या कालावधीत पडणा-या पावसामुळे माहे जानेवारी पर्यंत सदर नदी वाहत असते व त्यानंतर सुद्धा सदर नदीत नैसर्गिक डोह असून सदर डोहात झ-यांचे पाणी झिरपत असल्याने पुन्हा पावसाठा सुरु होईपर्यंत ठिकठिकाणी नदी पात्रात मुबलक प्रमाणात पाणी साचलेले असते. सदरचे नदीतील डोहामध्ये पाणी झिरपण्याच्या उद्देशाने वनविभागाने आंबा नदीचे वरील बाजूस असणा-या नाल्यांना दगडी नालाबांध व जलशोषक खंदक घालून पाणी अडवून पाणी जिरवण्याची कामे केलेली असून ते पाणी आंबा नदीतील डोहात साचते. त्यामुळे वन्यप्राण्यांना मुबलक पाण्याचा साठा उपलब्ध होत असतो म्हणून बेगळ्याने पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मनोधैर्य योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

(३६) **९६८६** (३-८-२०१५). **श्री. नागो गाणार, श्री. अनिल सोले, श्री. रामनाथ मोते, श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय महिला व बाल विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात ॲसिड हल्ला व बलात्कार पिडीत महिलांसाठी व बालकांसाठी आर्थिक सहाय्य देण्याकरीता शासनाने मानोधैर्य योजना सुरु केली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत नागपूर जिल्हा महिला व बालविकास विभागाला मागील १० महिन्यांपासून आर्थिक निधीची तरतूद करुन देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, विभागातर्फे या योजनेअंतर्गत शासनाकडे १ कोटी निधीची मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय;

(४) तसेच, ऑक्टोबर, २०१३ पासून लागू केलेल्या सदर योजनेंतर्गत ऑक्टोबर, २०१३ ते मार्च २०१५ पर्यंत २ हजार २३० अर्ज पात्र असून १ हजार ४५ महिला अपात्र ठरल्याचे दिनांक २२ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, सदर योजनेबाबत कॅगच्या अहवालात ताशेरे ओढले असून अद्याप ५० टक्के महिला मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय;

(६) असल्यास, सदर योजनेतील लाभार्थ्यांना वेळेत मदत मिळण्यासाठी निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (७-१०-२०१५) : (१) होय.

(२) नाही. या योजनेअंतर्गत नागपूर जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाला त्यांच्या मागणीनुसार दिनांक ३-९-२०१४ रोजी रुपये २० लाख, दिनांक १६-१-२०१५ रोजी रुपये ४० लाख, दिनांक ११-५-२०१५ रोजी रुपये ९ लाख व दिनांक २९-६-२०१५ रोजी रुपये १९ लाख इतका निधी देण्यात आलेला आहे.

(३) होय.

(४) नाही. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी दिलेल्या माहितीनुसार मार्च, २०१५ अखेर एकंदरीत ९३९ प्रकरणे संबंधीत जिल्हा मंडळाने नामंजूर केली आहे.

(५) होय. कॅगचा अहवाल दिनांक २५-६-२०१५ रोजी प्राप्त झाला. या अहवालानुसार सन २०१३-१४ मध्ये ४१० पैकी २९६ प्रकरणात अर्थसहाय्य अदा केले. तथापि, मनोधैर्य योजना ऑक्टोबर, २०१३ पासून कार्यान्वित झाल्यामुळे उर्वरित प्रकरणात निधी अभावी अर्थसहाय्य अदा करता आली नाही. मात्र सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

(६) या योजनेअंतर्गत शासनाने सन २०१३-१४ करीता रुपये ५,०४,४५,०००, सन २०१४-१५ करीता रुपये ३५,१०,९०,००० व सन २०१५-१६ करीता रुपये २१,८७,००० इतकी तरतूद केलेली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**जळगाव जिल्ह्यातील भडगाव व जामनेर येथील वृक्षांची अवैध केलेली तोड**

(३७) **९७०३** (३-८-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) जळगाव जिल्ह्यातील लोण, तांदूळवाडी, गोंडगाव, पिप्री व खाजोळा (ता. भडगाव) परिसरात वृक्षाची तसेच जामनेर-भुसावळ रस्त्यावर वन विभागाच्या हद्दीतील लिंबाच्या वृक्ष मोठ्या प्रमाणात कत्तल करून लाकडाची तस्करी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (२९-९-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवा (जिल्हा ठाणे) स्टेशन परिसरामध्ये महिला पत्रकारावर महिलांच्या डब्यात शिरून चोरट्यांनी हल्ला केल्याबाबत**

(३८) **९७२८** (६-८-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ, श्री. हेमंत टकले, श्री. नरेंद्र पाटील, श्री. अमरसिंह पंडित, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. किरण पावसकर, श्री. अनिल तटकरे, श्री. ख्वाजा बेग, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. अनिल भोसले, श्री. गुरूमुख जगवानी** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) कळवा (जिल्हा ठाणे) स्टेशनमध्ये महिलांच्या डब्यात शिरून महिला पत्रकारावार हल्ला करुन मोबाईल हिसकावून चोरटे पसार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ च्या दुस-या सप्ताहात घडली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास,उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर चोरट्यास पकडून त्यांचेवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (१९-९-२०१५) : (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी ठाणे रेल्वे पोलीस स्टेशन येथे दिनाक ८-४-२०१५ रोजी गु.र.क्र. २१८/२०१५ कलम ३५४, ३९७ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपींपैकी एका आरोपीस दिनांक ९-४-२०१५ रोजी अटक करण्यात आली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. अन्य आरोपीचा शोध सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गैरव्यवहार करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचया मालमत्तेचे विवरण सादर करणेबाबत**

(३९) **९८६६** (६-८-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ४७४ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरा संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे विहित नमून्यातील विवरण दरवर्षी या प्रयोजनार्थ विहित केलेल्या प्राधिकरणास सादर करण्याच्या प्रक्रियेअंतर्गत संशयास्पद भ्रष्ट अधिकारी व कर्मचा-यांची यादी तयार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय;

(२) असल्यास, त्यानुषंगाने संशयास्पद वा गैरव्यवहार करणारे किती अधिकारी व कर्मचारी निष्पन्न झाले आहेत;

(३) नसल्यास, ही कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (७-९-२०१५) : (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र. २६/११, दिनांक २ जून २०१४ नुसार सर्व शासकीय सेवकांनी (गट ड वगळून) आपले मालमत्ता दायित्व विवरणपत्र बंद लिफाफ्यात सक्षम प्राधिका-याकडे सादर करावयाची आहेत. या प्रक्रियेअंतर्गत संशयास्पद व भ्रष्ट अधिका-यांची यादी तयार करणे अपेक्षित नाही. मालमत्ता दायित्वाची विवरणपत्र सादर करणे व संशयास्पद सचोटी असलेल्या अधिका-यांची यादी तयार करणे या दोन बाबी स्वतंत्र आहेत.

(२) व (३) शासन परिपत्रक क्रमांक सीडीआर-१००५/प्र.क्र.१/५/११, दिनांक ३० ऑक्टोबर, २००६ नुसार संशयास्प्द सचोटी असलेल्या अधिका-यांची यादी तयार करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार १६ मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची माहिती प्राप्त झालेली असून या विभागांनी संशयास्पद सचोटी असलेल्या अधिका-यांची एकूण संख्या १३० अशी कळविली आहे. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा सुरु आहे.

---

**जि. प. प्राथमिक शाळा, ढेकुसिम (तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव) येथील मृत शिक्षिकेच्या सेवा पुस्तकातील वारसदारांच्या नामनिर्देशित नोंदीमध्ये खाडा-खोड करणा-या दोषींना शिक्षा होणेबाबत.**

(४०) **९८७६** (३-८-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ८२९ ला दिनांक ३१-३-२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ढेकुसिम, (तालुका अमळनेर, जिल्हा जळगांव) येथे प्राथमिक शिक्षिक म्हणून सेवा बजावलेल्या दिवंगत शिक्षिका कै. वंदना जयवंतराव सोनवणे यांच्या मृत्यूपश्चात त्याचे मूळ सेवा पुस्तकात व वारसदाराचे नामनिर्देशित फॉर्ममध्ये खाडा-खोड केले प्रकरणी, लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक २९ जूलै २०१३ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्रान्वये ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून मा. विभागीय आयुक्तांना संबंधित दोषींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहे ;

(२) असल्यास, मा. विभागीय आयुक्त यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २०१३ चे पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जळगांव यांना संबंधिताविरुद्ध कारवाईचे आदेश दिलेत हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, मुख्य अधिकारी जिल्हा परिषद जळगांव यांनी गटविकास अधिकारी (पंचायत समिती अमळनेर) यांनी दोषींविरुद्ध कारवाईचे आदेश देऊनही अद्याप संबंधिताविरुद्ध कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय;

(४) असल्यास, संबंधित मृत शिक्षिकेचे वारसदाराकडून याबाबत वारंवार पाठपुरावा होऊनही दोषीविरुद्ध जिल्हा परिषद जळगाव, तथा पंचायत समिती अमळनेर यांचेस्तरावरुन कारवाई होत नसल्याचे कारण काय आहे, या विलंबास जबाबदार कोण आहे व त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (२९-९-२०१५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सेवापुस्तीकेतील नामनिर्देशनामध्ये बेकायदेशीररित्या खाडाखोडीत जबाबदार असलेल्या व उपशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या दिवंगत शिक्षिकेच्या पतीकडून निधीची रक्कम शासन जमा करुन घेण्यात आलेली आहे. तसेच, याप्रकरणी सदरहू उपशिक्षक व कार्यालयीन लिपिक यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.

---

**राज्यात मुलींच्या शिक्षण आणि विवाहासाठी अल्पबचतीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष मोहिम राबवण्याबाबत**

(४१) **९९२९** (३-८-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ५९४२ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय महिला व बाल कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) बेटी बचाओ बेटी पाढओ या केंद्र पुरस्कृत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यातील १० जिल्ह्यांची निवड करण्यात येवून सदर जिल्हा अभियानातंर्गत सन २०१४-१५ व २०१६-१७ पर्यंत घ्यावयाच्या कार्यक्रमाबाबत भौतिक व आर्थिक आराखडा केंद्र शासनास सादर करण्यांत आला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त आराखड्यास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे काय;

(३) असल्यास, सदर योजनेसाठी कोणत्या १० जिल्ह्यांची निवड करण्यांत आलेली आहे;

(४) असल्यास, केंद्र शासनाकडून या आराखड्यास मंजूरी प्राप्त झालेली नसल्यास, त्यासाठी शासनाने कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (२९-९-२०१५) : (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. या योजनेकरिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १,५८,७३,००० इतका निधी माहे मार्च, २०१५ मध्ये केंद्र शासनाने वितरीत केला आहे. सदर निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास दिनांक २-७-२०१५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर निधी पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात येईल.

(३) (i) कोल्हापूर, (ii) सांगली, (iii) अहमदनगर, (iv) जळगांव, (v) औरंगाबाद, (vi) उस्मानाबाद, (vii) जालना, (viii) बीड, (ix) बुलढाणा, (x) वाशिम.

(४) बेटी बचाओ-बेटी पढाओ अभियानासाठी केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार सन २०१५-१६ चा भौतिक व आर्थिक आराखडा सदर १० जिल्ह्यांकडून प्राप्त करुन केंद्र शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम राबविण्याबाबत**

(४२) **१०३४०** (९-८-२०१५). **श्री. प्रकाश गजभिये** : सन्माननीय ग्राम विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात स्मार्ट सिटीच्या धर्तीवर स्मार्ट ग्राम राबविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) ही योजना केव्हापासून अंमलात आणण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (७-१०-२०१५) : (१) प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मंत्री मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

---

**पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यात तीन हजार कोटीचे रस्ते मंजूर करण्याबाबत**

(४३) **१०३४७** (३-८-२०१५). **श्री. प्रकाश गजभिये, श्री. सुनिल तटकरे, श्री. अनंत गाडगील, श्री. जयंतराव जाधव, श्री. हेमंत टकले, श्री. ख्वाजा बेग, श्री. अनिल भोसले** : सन्माननीय ग्राम विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात तीन हजार कोटीचे रस्ते मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर योजनेसाठी राज्यात ८ हजार ३०० कोटी ८५ लाखांच्या निधीची आवश्यकता असतांना शासनाने केवळ ३०० कोटी रुपयेच मंजूर केलेले आहेत, हे खरे आहे काय;

(३) असल्यास, पंतप्रधान ग्रामसडक योजनेत शासनाने राज्यासाठी २ हजार कोटी रुपयांच्या कामांचे आदेश जारी झाले होते त्यामुळे रस्ते व पुलांच्या निर्मितीची कामे सुरू झाली मात्र कामे अर्ध्यावर असतांना निधीची तरतूदच झालेली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(४) असल्यास, यातील ८०० कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली असून त्याची देयकेही सादर झाली आहेत, हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, पूर्ण झालेल्या कामांची देयकेच मिळत नसल्याने अमरावती, नागपूर, औरंगाबाद, पुणे व ठाणे या परिमंडळातील २,२०० कोटींची कामे अर्ध्यावर थांबविली आहेत व नाशिक जिल्ह्यातील सदर योजनेतील ४५ हून अधिक कामे निधी अभावी बंद आहेत, हे ही खरे आहे काय;

(६) असल्यास, कामे पूर्ण झाल्याची देयके मंजूर करण्याबाबत तसेच अर्धवट कामे पुर्णत्वास नेण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (१८-९-२०१५) : (१) सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या कालावधीत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-१ च्या टप्पा १०, ११ व १२ तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-२ करीता एकूण रुपये ३००४ कोटीचा रस्ते व पुलांचा कार्यक्रम केंद्र शासनाने मंजूर केला आहे.

(२) सदर मंजूर कामांच्या अनुषंगाने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये २०७ कोटी निधी वितरीत केला आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये रुपये २९१ कोटी इतका नियतव्यय केंद्र शासनाने निश्चित केला आहे.

(३) व (४) होय.

(५) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांच्या प्रमाणात कमी निधी केंद्रशासनाकडून प्राप्त झाल्याने योजनेच्य कामावर परिणाम झाला आहे.

(६) व (७) राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्यशासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या अधिका-यासोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरिता मा. मंत्री (ग्रामविकास) महोदया व मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दिनांक १ जून २०१५ रोजी मा. केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्राम विकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. त्याचप्रमाणे मा. मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दिनांक १-८-२०१५ च्या पत्रान्वये मा. प्रधानमंत्री व मा. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

## राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबवून त्याद्वारे विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करुन सिंचनाखाली क्षेत्र वाढविण्याबाबत

(४४) **१०७४३** (३-८-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय जलसंधारण विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबवून त्याद्वारे विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करुन सिंचनाखाली क्षेत्र वाढविण्याच्या व राज्य २०१९ पर्यंत दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय अलिकडेच शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त अभियानाचे स्वरुप काय आहे, त्यासाठी किती निधी लागणार आहे व सदरचा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे;

(३) असल्यास, उक्त अभियांतर्गत कामे कोणत्या यंत्रणेमार्फत केव्हापासून सुरु करण्यात येणार आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे** (६-१०-२०१५) : (१) होय, हे खरे आहे. राज्यात टंचाई परिस्थीतीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन जलयुक्त शिवार अभियान दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासननिर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

(२) सदर अभियान हे जलसंधारणाच्या अस्तिवात असलेल्या सर्व योजनेचे एकत्रिकरण करुन राबविण्यात येत आहे. या अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये ६२०० गावे निवडण्यात आली असून ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे.

या निवडण्यात आलेल्या गावांना गाव आराखड्यानुसार सुमारे रु. ८,७६०.७४ कोटी निधीची आवश्यकता आहे. निवडण्यात आलेल्या गावांकरिता जिल्हा नियोजन व विकास समिती मार्फत रु. १,००० कोटी चा विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच जलसंधारण विभाग विविध योजनेतील निधी, लोकसहभाग, (CSR) खासदार निधी आमदार निधी, जिल्हा परिषद स्थानिक निधी मधुनही काही प्रमाणात उपलब्ध होत आहे.

(३) सदर अभियानाची कामे लघुसिंचन (जलसंधारण) कृषि विभाग, जिल्हा परिषद, लोकसहभाग यामधुन दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सन १९८६ पुर्वीच्या निवृत्तीधारकांच्या निवृत्ती वेतनात सुधारणा करण्याबाबत**

(४५) **१०७५६** (३-८-२०१५). **श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय वित्तमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यातील सन १९८६ पुर्वीच्या निवृत्ती धारकांच्या निवृत्ती वेतनात सुधारणा करण्यासाठी मा. लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (५-९-२०१५) : (१) अशा प्रकारचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींचे अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) करिता प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात दारिद्र्य निर्मुलनासाठी नेमलेल्या समितीच्या कार्यकक्षेबाबत**

(४६) **१०८९४** (३१-७-२०१५). **ॲड. जयदेव गायकवाड, श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. ख्वाजा बेग, श्री. अनिल भोसले, श्री. नरेंद्र पाटील, श्री. किरण पावसकर** : सन्माननीय नियोजन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) राज्यात दारिद्र्य निर्मुलनासाठी निती आयोगाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवाच्या अध्यक्षतेखाली कृती गटाची स्थापना माहे एप्रिल, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर कृती गटाचे स्वरुप व कार्यकक्षा काय आहेत;

(३) असल्यास, कृती गटाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात केंव्हा करण्यात येणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (१-९-२०१५) : (१) होय, निती आयोगाच्या निदेशानुसार दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कृती गटाची स्थापना करण्यात आली होती. तथापि, त्यानंतर दिनांक ११ जून, २०१५ रोजीच्या शुद्धिपत्रकान्वये प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

(२) या कृती गटात एक अध्यक्ष, सदस्य म्हणून संबंधीत नऊ प्रशासकीय विभागाचे सचिव व दोन संयोजक सदस्य असे या कृती गटाचे स्वरुप आहे.

कृती गटाच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहेत.—

(अ) राज्यात कोणकोणत्या बाबीवरुन दारिद्र्य निर्मुलन झाल्यासारखे होईल.

(ब) दारिद्र्य निर्मुलनाच्या यशस्वी कार्यक्रमात इतर राज्यांबरोबर सहभाग साधणे.

(क) राज्यात दारिद्र्य निर्मूलनासाठी कोणकोणते प्रयत्न करणार आहात, जेणेकरुन वरील "अ" साध्य होईल.

(ड) दारिद्र्य निर्मूलनासाठी राज्यांच्या प्रयत्नांना निती आयोगाचे कशाप्रकारे सहाय्य / मदत अपेक्षित आहे.

(३) सदर कृती गटाच्या बैठका दिनांक ३० जून, २०१५ आणि दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी झाल्या असून कृती गटाचा अहवाल निती आयोगास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**शासनाकडून दिल्या जाणा-या निधीच्या कामाची विविध विभागात ६८ हजार कोटीच्या कामाची नोंद नसल्याबाबत**

(४७) **१०९२२** (३-८-२०१५). **श्री. प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) शासनाकडून दिल्या जाणा-या निधीच्या कामाची विविध विभागात ६८ हजार कोटीच्या कामाची नोंद नसल्याचे नियंत्रक आणि महालेखापालाच्या अहवालावरुन माहे एप्रिल, २०१५ च्या दुस-या सप्ताहात निर्दशनास आले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** (७-९-२०१५) : (१), (२), (३), व (४) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१४ संपलेल्या वर्षातील राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेद ३.१ व ३.९ नुसार अनुदानित संस्थाना दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याबद्दल निरीक्षण नोंदविलेले आहेत. संबंधित संस्थेत प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था व अनुदानित शैक्षणिक संस्थांना अंतर्भाव आहे. अशा संस्थेस सर्वसामान्यपणे खर्च करण्याची व ह्या संस्थेचे लेखापरीक्षणाची पद्धत विहीत केली आहे. अनुदान अखर्चित पडून असल्यास त्या संबंधी विहीत कालावधी नंतर त्या संस्थेच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये नोंद घेण्याची पद्धत आहे.

दरवर्षी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्याच्या वित्त व्यवस्थेवरील अहवालात उपयोगिता प्रमाणपत्राविषयी माहिती समाविष्ट असते. त्यानुषंगाने वित्त विभागामार्फत आढावा घेतला जातो.

प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र व खर्च व जमा ताळेबंद यांचा आढावा घेण्यासाठी सन २०१३ मध्ये मा. मुख्य सचिवांकडे सर्व प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या उपस्थितीत वरील विषयासंदर्भात आढावा घेण्यात आला. त्यावेळेस प्रधान महालेखापाल (ले.व ह.) महाराष्ट्र-१ या स्वतः उपस्थित होत्या. याबाबतच्या दिनांक २५ एप्रिल, २०१३ व दिनांक २८ मे, २०१३ इत्यादी बैठका मा. मुख्य सचिवांच्या दालनामध्ये घेण्यात आल्या.

मा. मुख्य सचिव यांचेकडील सचिव समन्वय समितीमधेही सन २०१४-१५ मध्ये दिनांक २५ मार्च, २०१५, दिनांक ८ एप्रिल, २०१५ दिनांक १३ जुलै, २०१५ व दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या बैठकीत याविषीचा आढावा घेण्यात आला.

मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार वित्त विभागाच्या सचिव स्तरावर सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी दर महिन्याला मंत्रालयीन विभागांनी नियुक्त केलेल्या नोडल अधिका-यांसमावेत बैठक घेण्यात येते.

सदर प्रलंबितता कमी करण्यासाठी वित्त विभागाने परिपत्रक क्र. मआख-२०१४-प्र. क्र. ४२-विनियम, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१४ अन्वये प्रशासकीय विभागांना निर्देश दिलेले आहेत.

मा. मंत्री (वित्त) यांच्या स्तरावर दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी सर्व कॅबिनेट मंत्र्याना सदर प्रलंबितता कमी करण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांना सुचना देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच, दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी अपर मुख्य सचिव यांच्या स्तरावर अर्धशासकीय पत्राद्वारे प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे व संक्षिप्त देयकांना निपटारा करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागाना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रधान सचिव (वि.सु.) यांच्या स्तरावर दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ च्या अर्धशासकीय पत्राद्वारे विहीत कालावधीत तपशिलवार देयके/उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रशासकीय विभागास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

याप्रमाणे वित्त विभागातर्फे नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

महालेखापाल/अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कॅगच्या अहवालात नमूद दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंतच्या रु. ६८ हजार कोटीच्या प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रापैकी, विविध विभागांकडून माहे जून २०१५ पर्यंत सुमारे रु. ४३.६ हजार कोटी रकमेची प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आलेली आहेत.

---

## महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलस्वामिनी श्रीतुळजाभवानी मंदिरात ठेकेदार व पुजारी यांनी केलेला गैरव्यवहार

(४८) **१०९५६** (६-८-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१३ ला दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय जलसंधारण विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलस्वामीनी श्री. तुळजाभवानी मंदिरात सन १९८९ ते २००९ या कालावधीतील सिंहासन दानपेटीतील सोने-चांदी व्यवहाराचे विशेष लेखाधिकारी, जिल्हाधिकारी, कार्यालय, लातूर यांच्या पथकाकडून जे करण्यात आलेल्या लेखा परिक्षणाचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय;

(२) असल्यास, अहवालातून काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय;

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२८-९-२०१५) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील उड्डाणपूलांखाली बेकायदा पे ॲण्ड पार्कींग होत असणे

(४९) **२१९६८** (२२-१२-२०११). **श्री. किरण पावसकर, श्री. हेमंत टकले, श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. सतीश चव्हाण, श्री. संदीप बाजोरिया** : सन्माननीय जलसंधारण विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए. व एम.एस.आर.डी.सी. तसेच महानगरपालिकेने बांधलेल्या उड्डाणपुलांखाली बेकायदा पे ॲण्ड पार्कींग होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, पोलीस आणि वाहतूक विभागाच्या संगनमताने गेल्या वर्षभरापासून हे प्रकार होत असल्याचे उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय;

(३) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुषंगाने काय कारवाई केली अथवा केली जणार आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (३-१०-२०१५) : (१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून त्यांचे अखत्यारीतील उड्डाणपुलाखाली सशुल्क वाहनतळ चालविण्यासाठी कंत्राट देण्यात आलेल्या जागेपैकी कंत्राटाची मुदत संपलेल्या वाहनतळाच्या जागेचा त्यांचेकडे ताबा हस्तांतरीत करुन घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अखत्यारीतील उड्डाणपुलाखालील जागेचा अनाधिकृत वाहनतळासाठी वापर होत असल्याचे आढळून आल्यास त्यांचेमार्फत पोलीस विभागाच्या मदतीने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### जिल्हा परिषद स्तरावरील आरोग्य संस्थेच्या इमारतीच्या बांधकामांना परवानगी देण्याबाबत

(५०) **४८२३७** (२७-१-२०१४). **श्री. जयवंतराव जाधव, श्री. अनिल भोसले** : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

(१) जिल्हा परिषद स्तरावरील आरोग्य संस्था इमारतीच्या बांधकामांना मान्यता देण्याचे अधिकार पुर्ववत जिल्हा परिषद प्राधिकरणाला देण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय;

(२) तसेच आरोग्य सेवा संचालनालयातील विलंबामुळे आरोग्य संस्थाची बांधकामे विहीत वेळेत सुरु करता येत नसल्याने अनुदाने अखर्चित राहत असल्याबाबत नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषद पदाधिका-यांनी शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय;

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रश्न भाग (२) च्या अनुषंगाने आरोग्य संस्था इमारत बांधकाम परवानगी धोरणाबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** (१७-८-२०१५) : (१) हे खरे आहे. मा. मुख्यमंत्री यांना मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग व पर्यटन यांनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ अन्वये रु. १०.०० लाखावरील कामासाठी मान्यता घेण्याची अट रद्द करण्याबाबत निवेदन दिले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडून नविन बांधकामास परवानगी देण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावास संचालनालयाकडून मान्यता देण्यास विलंब झालेला नाही. ग्रामविकास विभागाने दिनांक १९ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयाअन्वये जिल्हा परिषदांमध्ये व बांधकाम व विकास योजना राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्याबाबत जिल्हा परिषद पंचायत यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यास व संचालनालयाने बांधकामाबाबत निश्चित केलेली मार्गदर्शक तत्वे कायम ठेवून प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या बांधकामासाठी आरोग्य सेवा संचालनालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**विधान भवन :**
नागपूर.

शामुना-एचबी-२११०-मविसमुं-११-२०१५-८१० प्रती पीआर८*